# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

: जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)

**Maharashtra Water Resources Regulatory Authority**

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra

Water Resources Regulatory Authority Act, 2005)

क्रमांक : मजनिप्रा/२०१७/विधि विषयक/प्रकरण क्र ३/२०१८/(४९५)

दि. १२/०७/२०१८

**कुकडी लाभक्षेत्रातून सिना धरणात १.२ टीएमसी पाणी सोडण्याविषयी ॲड. शिवाजी अनाभुले व इतर २ यांनी याचिका ॲड. कैलाश शेवाळे मार्फत दाखल केली; प्रकरण क्र. ३/२०१८**

यासोबत दि. १२/०७/२०१८ चा मजनिप्रा आदेश क्रमांक ११/२०१८ जोडला आहे.

सहपत्र: वरील प्रमाणे

स्वाक्षरित
(डॉ. सुरेश कुळकर्णी)
सचिव

प्रति:— माहितीकरिता तथा आवश्यक कार्यवाही साठी—

१. ॲड. कैलाश शंकरराव शेवाळे, राहणार, पाटेगाव, ता. कर्जत, जि. अहमदनगर —करिता ॲड. शिवाजी मारुती अनाभुले व इतर २
२. सचिव (ज. सं. व्य व ला. क्षे. वि.), ज. सं. विभाग, मंत्रालय, मॅडम कामा रोड, मुंबई, ४०००३२
३. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे, ४११०११
४. मुख्य अभियंता, (वि.प्र.) ज. सं. वि. सिंचन विभाग, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे, ४११०११
५. अधिक्षक अभियंता, कुकडी सिंचन मंडळ, सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे, ४११०११

9th Floor & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel. (O) +91-22-22152019 E_mail : mwrra@mwrra.in | mwrralibrary@yahoo.co.in | website : www.mwrra.org

दस्तावेज क्र. ४७

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)

**Maharashtra Water Resources Regulatory Authority**

(A Statutory Authoirty Established u/s 3 of

Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)

**आदेश क्रमांक: ११/२०१८**

**कुकडी लाभक्षेत्रातून सिना धरणात १.२ टीएमसी पाणी सोडण्याविषयी ॲड. शिवाजी अनाभुले व इतर २ यांनी याचिका ॲड. कैलाश शेवाळे मार्फत दाखल केली; प्रकरण क्र. ३/२०१८**

१. ॲड. श्री. शिवाजी मारुती अनाभुले, राहणार घुमारी, ता. कर्जत, जि. अहमदनगर

२. ॲड. कैलास शंकरराव शेवाळे, राहणार पाटेगाव, ता. कर्जत, जि. अहमदनगर

३. श्री. मिलींद दत्तात्रय बागल, राहणार टाकळी खंडेश्वरी, ता. कर्जत, जि. अहमदनगर

विरुध्द

१. सचिव (ज. सं. व्य व ला. क्षे. वि.), ज. सं. विभाग, मंत्रालय, मॅडम कामा रोड, मुंबई, ४०००३२

२. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे, ४११०११

३. मुख्य अभियंता, (वि.प्र.) ज. सं. वि. सिंचन विभाग, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे, ४११०११

४. अधिक्षक अभियंता, कुकडी सिंचन मंडळ, सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे, ४११०११ ...................... प्रतिवादी

9th Floor & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel. (O) +91-22-22152019 E_mail : mwrra@mwrra.in | mwrralibrary@yahoo.co.in | website : www.mwrra.org

**अंतरिम आदेश**

**कोरम : श्री. व्ही. एम. कुळकर्णी, अध्यक्ष व सदस्य**
**(ज. सं. अभियांत्रिकी)**
**श्री. विनोद जे. तिवारी, सदस्य, (विधि)**
**श्री. शिवाजी टी. सांगळे,**
**सदस्य (इकॉनामी)**
**दि. १२/०७/२०१८**

अनुतोष मिळावा म्हणुन दि. २०/०४/२०१६ ला कुकडी लाभक्षेत्रातून सिना धरणात १.२ टीएमसी पाणी सोडण्याविषयी ॲड. शिवाजी अनाभुले व इतर २ यांनी याचिका ॲड. कैलाश शेवाळे मार्फत याचिका प्राधिकरणासमोर दाखल केली;

**१. याचिकेत अशी प्रार्थना केली आहे.**

अर्जदाराचा अर्ज मान्य करण्यात यावा.

अ) वर नमूद हकिगतीस व परिस्थितीच्या अनुसरून कायदेशीर तरतुदीनुसार कुकडी लाभक्षेत्रात जमा होणाऱ्या एकूण पाण्यापैकी १.२ टी.एम.सी. पाणी समान व न्याय हक्काने व तुटीचे खोरे भरून काढण्यासाठी सिना धरणात १.२ टी.एम.सी. पाणी सिंना धरणात कायम सोडण्याचा मे. कोर्टाचा आदेश व्हावा.

ब) सदर मंजूर कोट्यानुसार पाणी वाटपाचा व आवर्तनाचा कार्यक्रम ठरवून मिळावा. तसेच कुकडीच्या अवर्तनाबरोबर सिना लाभक्षेत्रातील पाण्याचे अवर्तन उपलब्ध करून द्यावे असा जाब देणाऱ्याने आदेश करावा.

क) कुकडी धरणातील लाभक्षेत्रातून सिना मध्यम प्रकल्पासाठी हक्काचा समान न्याय हक्काप्रमाणे १.२ टी.एम.सी. पाणीसाठा उपलब्ध करून द्यावा व सिना धरण कुकडी प्रकल्पामध्ये वर्ग करून सिना धरणात रेग्युलर पाणी सोडण्यात यावे ही विनंती.

क) सदर मंजूर कोट्यानुसार पाणी कोट्याचा व अवर्तनाचा कार्यक्रम ठरवून मिळावा तसेच कुकडीच्या आवर्तनाबरोबर सिना लाभक्षेत्रातील पाण्याचे आवर्तन उपलब्ध करून द्यावे देणाऱ्याने आदेश करावा असा जाब.

प्रकरणात पहिली सुनावणी दि. २७/०६२२०१८ ला घेतली. त्यात खालीलप्रमाणे हजर होते.

श्री. एच. टी. धुमाळ – अधिक्षक अभियंता, कुकडी सिंचन मंडळ, पूणे

श्री. एस. एन. कोळी – कार्यकारी अभियंता

श्री मिलिंद बागल – याचिकाकर्ते

श्री. कैलास शेवाळे – याचिकाकर्त्याचे ॲडव्होकेट

श्रीमती वैशाली कुरणे – अवर सचिव व कार्यकारी अभियंता, ज.सं.वि. मंत्रालय, मुंबई

**२. सादर केलेली कागदपत्रे :**

१. प्रतिवादी क्र. ४ चे परिच्छेदाप्रमाणे उत्तर, शपथपत्रा शिवाय

२. शासनाचे पत्र क्र. कुकडी/प्र.क. १३७/१८/मो प्र. १ दि. २२/०३/२०१८, हे याचिकाकर्त्यांनी सादर केले

**३. पक्षांनी केलेला युक्तिवाद.**

३.१) प्राधिकरणाने प्रतिवादी क्र. २ व ३ चे, नोटीस पाठवुनही प्रतिनिधी न आल्याने नापसंती व्यक्त केली.

३.२) प्राधिकरणाने प्रतिवादी क्र. ४ यांनी आपले उत्तर शपथपत्रात सादर केले नाही याकडे लक्ष वेधले. त्यामुळे त्यांनी दिलेले उत्तर समर्थनिय नाही.

३.३) याचिकाकर्त्यांनी शासनाचे पत्र क्र. कुकडी/०३१८/प्र.क. १३७/१८/मो प्र. १ दि. २२/०३/२०१८, चा उल्लेख करुन सांगितले की, शासनाने २२५ एमसीएफटी पाणी कुकडी प्रकल्पातुन सिना प्रकल्पात सोडण्यास तत्वत: मंजुरी दिली आहे. असे असतानाही प्रकल्प प्राधिकाऱ्यांनी शासनाचे निर्देश पाळलेले नाही.

३.४) याचिकाकर्त्याने लक्षात आणुन दिले की, सिना मध्यम प्रकल्पाच्या प्रस्तावाला सुधारित प्रशासनिक मान्यता (सुप्रमा) प्राप्त झाली आहे, त्याप्रमाणे १२०० एमसीएफटी पाणी कुकडी धरणाच्या वरुन वाहणाऱ्या प्रवाहातून (परिवाही) सिना धरणात सोडण्याची तरतुद केली आहे.

३.५) प्रतिवादी क्र. ४ ने त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, कुकडी मध्यम प्रकल्पाच्या प्रकल्प अहवालात तदनुरुप १२०० एमसीएफटी पाणी त्याच्या वरुन वाहणाऱ्या प्रवाहातुन सिना धरणात सोडण्याचा उल्लेख नाही. शासनाचे पत्र क्र. कुकडी/०३१८/ प्र.क. १३७/१८/मो प्र. १ दि. २२/०३/२०१८ त्यामधे शासनाने २२५ एमसीएफटी पाणी कुकडी प्रकल्पातुन सिना प्रकल्पात सोडण्यास तत्वत: मंजुरी दिली आहे. परंतु आता सु.प्र.मा च्या प्रस्तावाला अनुसरुन राज्य स्तरावरील तांत्रिक सल्लागार समितिने १०० एमसीएफटी पाणी कुकडी धरणातुन सिना धरणात सोडण्याची शिफारस केली आहे. त्यामुळे नक्की किती पाणी कुकडी धरणातुन सिना प्रकल्पात सोडावयाचे याची निश्चिती, शासनाने सु. प्र. मा. ला मंजुरी दिल्यावर, केली आहे.

**४. प्राधिकरणाचे अवलोकन :**

राज्य शासनाने बराच पैसा कुकडी डाव्या कालव्यातुन सिना जलाशयात सोडण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी गुंतवला आहे. प्राधिकरणाचे मत आहे की, सु. प्र. मा. ला मंजुरी देणे आणि सुधारित पाणी नियोजनाला मंजुरी देणे या दोन भिन्न गोष्टी आहेत. कुकडी मध्यम प्रकल्पाचे सुधारित पाणी नियोजनाला, सुप्रमा च्या मंजुरीची वाट न पाहता शासन मान्यता देऊ शकते.

**५. निर्देश :**

दोन्ही पक्षांनी मांडलेल्या बाजु लक्षात घेवून आणि जी माहिती सुनावणी दरम्यान प्राप्त झाली आहे, त्याप्रमाणे प्राधिकरण खाली दिल्यानुसार निर्देश देत आहे:—

प्रतिवादी क्र. १ कुकडी प्रकल्पाचे सुधारित पाणी नियोजनाला मान्यता देऊन तसा शासन निर्णय, हा आदेश प्राप्त झाल्याच्या ४५ दिवसाच्या आत, निर्गमित करतील. यामधे सिना प्रकल्पाला मिळणाऱ्या ठरवलेला हिस्सा दर्शवला असेल आणि जेंव्हा जलाशयाच्या वरुन पाणी वाहणाऱ्या वर्षात सिना प्रकल्पाकडे किती पाणी वळविण्यात येईल याचा उल्लेख असावा. त्यानंतर १५ दिवसाचे आत, प्रतिवादी क्र. २ ते ४ उत्तरादाखल शपथपत्र सादर करावे. आणखी, याचिकाकर्ते हे यावर प्रत्युत्तर, काही असल्यास, १५ दिवसाचे आत दाखल करु शकतात.

या प्रकरणात पुढील सुनावणी ०३/१०/२०१८ ला १२.३० वा, दुपारी, होईल.

स्वा.

विनोद जे. तिवारी

सदस्य (विधि)

स्वा

डॉ. एस. टी. सांगळे

सदस्य (इकॉनॉमी)

स्वा

श्री. व्ही. एम. कुळकर्णी

सदस्य (ज. सं. अभियांत्रिकी) व प्रभारी अध्यक्ष